**ठळक बातम्या**

- बँका, शेअर्समधली दावा न केलेली रक्कम गुंतवणूकदारांना परत करण्यासाठी वेगवान मोहिम राबवण्याचे केंद्रीय अर्थमंत्र्यांचे आदेश

- राज्यातल्या सर्व प्रमुख धरणांमधे गेल्या वर्षीच्या तुलनेत चांगला पाणीसाठा, मोसमी पाऊस येत्या तीन-चार दिवसांत पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारच्या कार्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून गौरव

- राजस्थानात नदीत वाहून गेल्यानं ८ मुलांचा मृत्यू

**आणि**

- भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांना घेऊन जाणारं यान उद्या संध्याकाळी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाकडे झेपावणार

**<><><><>**

बँकांच्या ठेवी, लाभांश, शेअर्स यामध्ये गुंतवणूक केलेल्या पण दावा न केलेल्या मालमत्ता पात्र गुंतवणूकदारांना देण्यासाठी वेगवान प्रक्रीया राबवण्याचे आदेश केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिले आहे. आर्थिक स्थिरता आणि विकास परिषदेच्या बैठकीत त्या मुंबईत बोलत होत्या. विविध वित्तीय संस्थांनी यासाठी एकत्रित प्रयत्न करावे आणि जिल्हापातळीवर मेळावे घ्यावे, असं त्या म्हणाल्या. वित्तीय क्षेत्रात KYC प्रक्रिया सुलभ करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

**<><><><>**

राज्य मंत्रिमंडळानं आजच्या बैठकीत पाऊस, पीकपाणी, धरणाच्या जलाशयांमधला पाणी साठा, इत्यादींचा आढावा घेतला. राज्यातल्या सर्व प्रमुख धरणांमधे गेल्या वर्षीच्या तुलनेत चांगला पाणीसाठा असल्याची माहिती जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांनी यावेळी दिली. राज्यात पंधरा जूननंतरच मोसमी पाऊस पूर्णपणे सक्रिय

होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये, असं आवाहन कृषि विभागानं केलं आहे. या बैठकीत कृषि विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी राज्यातलं पीकपाणी, पेरण्या, खतपुरवठा याबाबत सादरीकरणाव्दारे माहिती दिली.

मोसमी पाऊस येत्या तीन-चार दिवसांत पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता आहे, अशी माहिती कुलाबा वेधशाळेच्या संचालक शुभांगी भुते यांनी सादरीकरणाद्वारे दिली.

**<><><><>**

विविध प्रकारच्या मद्यावरच्या उत्पादन शुल्कात वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारनं आज घेतला. त्यात मद्याची घाऊक आणि किरकोळ विक्री किंमत वाढवली आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या बळकटीकरणासाठी ७४४ नवीन पदं आणि पर्यवेक्षीय स्वरूपाची ४७९ पदं अशा १ हजार २२३ पदांच्या सुधारित आकृतीबंधालाही मंत्रिमंडळानं मान्यता दिली आहे.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालचं सरकार गतीशील आणि निर्णयक्षम सरकार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात सुरू असलेल्या विकासकामांचा उल्लेख मुख्यमंत्र्यांनी यावेळी केला. केंद्र सरकारने महाराष्ट्रात रेल्वेसाठी भरीव तरतूद केली असंही मुख्यमंत्री म्हणाले.

**होल्ड बाईट मुख्यमंत्री (२९ सेकंद)**

भारताची अर्थव्यवस्था चौथ्या क्रमाकांची अर्थव्यवस्था बनली असून प्रधानमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली एक शक्तिशाली भारत निर्माण झाला आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

मुंबईत उपनगरी रेल्वेगाड्यांच्या अपघाताला प्रचंड गर्दी कारणीभूत असल्यामुळे सरकारी कार्यालयांच्या वेळेत बदल करण्याचा निर्णय घेतल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी यावेळी सांगितलं. उपनगरी गाड्यातले अपघात थांबवण्यासाठी गर्दी नियंत्रणात आणणं गरजेचं आहे, त्यामुळे सरकारी कार्यालयाच्या वेळेत बदल करण्यात आला आहे, खासगी कंपन्यांना वेळेत बदल करणं शक्य नाही. त्यामुळे त्यासाठी वेगळा उपाय शोधला जाईल,

असं मुख्यमंत्री म्हणाले. वातानुकूलित रेल्वेगाड्यांची संख्या वाढवण्याचा विचार केंद्र सरकार करत असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारच्या गेल्या अकरा वर्षाच्या कार्यकाळात झालेल्या विकासयात्रेचा लाभ महाराष्ट्राला मिळाला, हे महाराष्ट्राचं भाग्य आहे, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. समृद्धी महामार्ग, मुंबई मेट्रो, बुलेट ट्रेन प्रकल्प, किनारी महामार्ग, अटल सेतू अशा महत्त्वाच्या प्रकल्पांमुळे महाराष्ट्र समृद्ध झाला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या काळात गतिमान प्रगती झाली, असं शिंदे म्हणाले.

**<><><>**

सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्त्वांनी प्रेरित होऊन भारताने गेल्या दशकात उल्लेखनीय परिवर्तन अनुभवलं आहे. त्यातला राष्ट्रीय सुरक्षा हा घटक प्रामुख्याने दिसून आला आहे. २०१६मध्ये केलेल्या सर्जिकल स्ट्राईकपासून ते ऑपरेशन सिंदूरपर्यंतच्या काळात भारताने आपल्या दृढनिश्चय आणि आत्मविश्वासानं दहशतवादाविरुद्ध शून्य सहिष्णुतेचं धोरण ठळकपणे अधोरेखित केलं आहे. नुकत्याच झालेल्या ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतीय सैन्यदलांच्या चपळ हालचाली, अचूक रणनीती आणि त्याला मिळालेली स्वदेशी बनावटीच्या शस्त्रास्त्रांची साथ याचं दर्शन झालं आहे. विमानवाहू जहाज आयएनएस विक्रांतपासून ते उंचावरच्या लढाईसाठी उपयुक्त ठरणारं एलसीएचसारखं हेलिकॉप्टर यांचा यात समावेश होतो. यासोबत गेल्या दशकभरात संरक्षण क्षेत्रातली निर्यात २३ हजार ६२२ कोटी इतक्या विक्रमी पातळीपर्यंत पोहोचली आहे. ही वाढ २०१४मध्ये झालेल्या निर्यातीच्या ३४ पट अधिक आहे. इनोव्हेशन्स फॉर डिफेन्स एक्सलन्स, आयडीईएक्स सारख्या उपक्रमांच्या माध्यमातून संरक्षण क्षेत्रातल्या स्टार्टअप्सना प्रोत्साहन दिलं आहे.

**<><><>**

राजस्थानात टोंक इथं आज बनास नदीत ८ मुलं वाहून गेली. इतर तिघांना वाचवण्यात यश आलं असून त्यांची प्रकृती स्थीर आहे. ते सर्वजण जयपूरच्या हसनपुरा

भागातले रहिवासी असून आंघोळीसाठी गेले असताना ही दुर्घटना झाल्याचं पोलिसांनी सांगितलं.

<><><>

ऑस्ट्रियामधल्या ग्राज या शहरातल्या माध्यमिक शाळेत झालेल्या गोळीबारात नऊ लोकांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. मृतांमधे गोळीबार करणाऱ्याचाही समावेश आहे. या घटनेनंतर पोलिसांनी सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना सुरक्षितपणे बाहेर काढलं.

<><><>

ऑक्सियम-4 या अंतराळ मोहिमेसाठी अमेरिका, भारत, पोलंड आणि हंगेरीचे चार अंतराळवीर उद्या रवाना होणार आहेत. १४ दिवसांच्या वैज्ञानिक मोहिमेसाठी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर घेऊन जाणार आहे. भारतीय वेळेनुसार उद्या संध्याकाळी साडे पाच वाजता फ्लोरिडा इथल्या केनेडी स्पेस सेंटरवरून त्यांचं अंतराळ यान उड्डाण करेल. भारताचे अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांचा या पथकात समावेश आहे. ही मोहीम यशस्वी झाली तर शुक्ला हे आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पाऊल ठेवणारे पहिले भारतीय बनतील. भारतीय हवाई दल तसंच उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी शुक्ला यांना या मोहिमेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><>

दहशतवाद्यांनी भारतावर हल्ला केला तर ते पाकिस्तानसह जिथं कुठं असतील तिथून शोधून त्यांना धडा शिकवला जाईल, असं पुनर्प्रतिपादन परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी केलं आहे. फ्रांसमधे एका वृत्तपत्राला मुलाखत देतांना त्यांनी सांगितलं की, दहशतवादाच्या बाबतीत भारताची भूमिका, अजिबात खपवून न घेण्याची आहे. याउलट पाकिस्तान दहशतवाद्यांना सातत्यानं पाठबळ देत आहे. भारताची लढाई कोणत्याही विशिष्ट देशाविरूद्ध नाही, तर दहशतवादाच्या विरोधात आहे, असं ते म्हणाले.

<><><>

दहशतवादाविरोधातली भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी काँग्रेस खासदार शशी थरूर यांच्या नेतृत्वाखाली गेलेलं संसदीय शिष्टमंडळ पाच देशांचा यशस्वी दौरा करून आज

भारतात परतलं. अमेरिका, पनामा, गयाना, ब्राझील आणि कोलंबिया या देशांना या शिष्टमंडळानं भेट दिली. या दौऱ्यात अनेक भेटीगाठी झाल्या, त्यात सकारात्मक प्रतिसाद मिळाला, असं थरूर यांनी नवी दिल्ली इथं बातमीदारांशी बोलतांना सांगितलं.

<><><><>

अमेरिकेतल्या न्यूजर्सी इथल्या नेवार्क विमानतळावर एका भारतीय नागरिकाला अटक झाल्याचा दावा समाजमाध्यमावरल्या पोस्टद्वारे केला जात आहे, परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने हा मुद्दा नवी दिल्लीतल्या अमेरिकन दुतावासाकडे उपस्थित केला आहे. वॉशिंग्टनमधील भारतीय दुतावास आणि न्यूयॉर्कमधील भारतीय वाणिज्य दुतावास या घटनेची शहानिशा करण्यासाठी अमेरिकन उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या संपर्कात आहेत.

<><><><>

युक्रेनच्या किव आणि ओडेसा शहरांवर रशियानं ३०० हुन अधिक ड्रोन आणि क्षेपणास्त्र वापरून केलेल्या हल्ल्यात किमान २ जण ठार तर १३ जण जखमी झाले आहेत. रशियानं युक्रेनवर रात्रभर केलेल्या हल्ल्यात ३१५ ड्रोन आणि ७ क्षेपणास्त्रं डागल्याचं युक्रेनचे अध्यक्ष वोलोदीमीर झेलेन्स्की यांनी सांगितलं. तर यापैकी २८४ ड्रोन आणि ७ क्षेपणास्त्रं रोखण्यात आली अशी माहिती युक्रेनच्या वायू दलानं दिली आहे.

<><><><>

येमेनच्या होईदाह या शहरावर इस्त्राइलच्या नौदलानं आज हल्ला केला. युद्धग्रस्तांना मदत सामग्री पुरवणाऱ्या बंदरावर इस्त्राइलनं क्षेपणास्त्र डागली. हौथी बंडखोरांकडून शस्त्रास्त्र हस्तांतरणासाठी या बंदराचा वापर केला जातो, असा दावा इस्त्राइलनं केला आहे.

//<><><><>//